N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** भंडारा **P.S.(ठाणे):** मोहाडी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0138 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 08/05/2024 20:37

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार
   **Time Period (कालावधी):** पहर 6
   **Date From (दिनांक पासून):** 08/05/2024
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 08/05/2024
   **Time From (वेळेपासून):** 17:36 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 18:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 08/05/2024 **Time (वेळ):** 20:07 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 029
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 08/05/2024 20:06 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 01 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** मोहाडी,मोहाडी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
**(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

फिर्याद

पोलीस स्टेशन, मोहाडी
दिनांक: ०८/०५/२०२४

नाव - राहूल गजानन बांडेबूचे, वय २३ वर्षे रा. रोहा, ता- मोहाडी, जिल्हा- भंडारा. व्यवसाय - बिल्डिंग मटेरिअल सप्लायर्स, मो. क्र. ७४९८८२९१८७

मी दिनांक १२/०३/२०२४ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, भंडारा येथे जावून पोलीस निरीक्षक, कमलेश सोनटक्के साहेब यांचे कडे तक्रार दिली होती की, दिनांक ११/०३/२०२४ रोजी रोहा या गावातील माझ्या वाळुच्या ठिय्या वरून माझा ट्रॅक्टर क्रमांक एम.एच. ३६/ए.एल.३७९० चे ट्रॉलीमध्ये वाळु भरून ट्रॅक्टर मोहाडी मार्गे डोंगरगाव येथे जात असतांना रात्री ०८:०० वाजताच्या दरम्यान मोहाडी येथील डोंगरगाव मार्गावरील परमात्मा एक भवन च्या समोर वैभव जाधव, तलाठी रोहा यांनी त्यांचे स्टाफ सह माझा वाळुने भरलेला ट्रॅक्टर पकडुन तो ट्रॅक्टर सोडल्याने ट्रॅक्टर सोडल्याचा मोबदला म्हणुन मला २५,०००/-रुपये लाच रक्कमेची मागणी केली असल्याबाबत गैरअर्जदार यांचेवर कारवाई होणेस तक्रार दिली ते खालील प्रमाणे.

तक्रार, भंडारा, दिनांक १२/०३/२०२४, प्रति, मा. पोलीस उप- अधीक्षक साहेब, ॲन्टी करप्शन ब्युरो विभाग, भंडारा.विषय गैरअर्जदार वैभव,जाधव, तलाठी रोहा हे लाच मागत असल्याने त्यांचेवर कारवाई होणे बाबत अर्जदार राहूल गजानन बांडेबूचे, वय २३ वर्षे, रा. रोहा, ता.- मोहाडी, जिल्हा- भंडारा. व्यवसाय - बिल्डिंग मटेरिअल सप्लायर्स, मो. क्र. ७४९८८२९१८७, **महोदय,** मी मौजा रोहा येथील रहीवासी असुन आज रोजी माझा मित्र अजय गाढवे, रा. रोहा याचे सोबत लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, भंडारा येथे येवून तक्रार देतो की, माझे कडे ३ ट्रॅक्टर असून लोकांचे मागणी प्रमाणे मी बिल्डिंग मटेरिअल पुरविण्याचे काम करतो. मला मिळालेल्या ग्राहकांच्या मागणी नुसार माझ्याकडे असलेल्या ३ ट्रॅक्टर द्वारे व्यापाऱ्याचे दुकानातुन गिटटी, सिंमेट, लोहा, वाळु पोहचविण्याचे काम करतो.

दिनांक ११/०३/२०२४ रोजी रोहा या गावातील माझ्या वाळुच्या ठिय्या वरुन माझा ट्रॅक्टर क्रमांक एम. एच. ३६/ए.एल.३७९० चे ट्रॉलीमध्ये वाळु भरून ट्रॅक्टर मोहाडी मार्गे डोंगरगाव येथे जात असतांना रात्री ०८:०० वाजताच्या दरम्यान मोंहाडी येथील डोंगरगाव मार्गावरील परमात्मा एक भवन च्या समोर वैभव जाधव, तलाठी रोहा यांनी त्यांचे स्टाफ सह माझा वाळुने भरलेला ट्रॅक्टर पकडला असता माझ्या ट्रॅक्टर चा ड्रायव्हर गणेश ठवकर याने फोन करुन, तलाठीने ट्रॅक्टर पकडला असल्याचे मला सांगितल्याने मी लगेच तिथे गेलो. तेथे रोहा या गावचे तलाठी वैभव जाधव व बेटाळा या गावचे तलाठी विकास कदम हे माझ्या ट्रॅक्टर जवळ उभे होते व एक कार तेथे होती. माझ्या ट्रॅक्टर ची चाबी व ड्रायव्हर चा मोबाईल फोन वैभव जांधव यांचे जवळ होता. तेव्हा तलाठी वैभव जाधव यांना मी म्हणालो की साहेब हा माझा ट्रॅक्टर आहे, साहेब सोडून दया. तेव्हा तो मला थोडे दुर नेवुन म्हणाला की, तू अवैधरित्या विना परवाना वाळूची वाहतूक करीत आहेस तर तुझ्या ट्रॅक्टरवर कारवाई करावी लागेल. त्यावर मी सोडून दया साहेब असे बोललो असता तलाठी जाधव यांनी ट्रॅक्टर सोडवायचा असेल तर २५,०००/-रू. लागतील असे बोलला. परंतू माझ्या जवळ २५,०००/-रू. सध्या नाही आहेत असे मी त्यांना सांगितले. त्यावर तलाठी वैभव जाधव याने तुझ्यावर विश्वास ठेवून ट्रॅक्टर सोडतो पण उदया २५,०००/-रू. आणून दे, असे बोलला. त्यावर ठिक आहे साहेब असे मी बोललो असता त्याने माझा ट्रॅक्टर सोडला. त्यानंतर मी तेथून निघून आलो. आज सकाळी ०७:५० वाजता तलाठी वैभव जाधव याने माझे मोबाइल वर व्हॉटसअप कॉल केला परंतू मी त्याचा कॉल उचलला नाही.

तरी गैरअर्जदार तलाठी वैभव जाधव हे माझ्या वाळूच्या ट्रॅक्टरवर कोणतीही कारवाई न करता सोडल्याचा मोबदला म्हणून मला २५,०००/-रुपये लाच मागत असुन त्यांना लाच रक्कम देण्याची माझी ईच्छा

Sontakke
8/5/24
(कमलेश वि. सोनटक्के)
पोलीस निरीक्षक
ला.प्र.वि. भंडारा

Rahu
08/5/2024



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** राहुल गजानन बांडेबुचे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 2001

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रोहा,मोहाडी,मोहाडी,भंडारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रोहा,मोहाडी,मोहाडी,भंडारा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | वैभव जनार्धन जाधव | | | 1. नेहरु वार्ड मोहाडी,मोहाडी, मोहाडी,भंडारा,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रानिक सामान , | मोबाईल फोन | 1) 32 जी.बी. क्षमतेची सनडीस्क कंपनीची तिन मेमरी कार्ड ज्यात पडताळणी/सापळा कार्यवा | 50,000.00 |



Police Station Mohadi Dist. Bhandara

Scanned with OKEN Scanner

नाही. गैरअर्जदार याचे सोबत माझी कोणतीही दुश्मनी किंवा आर्थीक व्यवहार नाही. गैरअर्जदारला मला लाच रक्कम देण्याची ईच्छा नसल्याने त्यांचेवर कारवाई होणेस आज रोजी तक्रार देत आहे.

दिनांक १२/०३/२०२४ रोजी वरील प्रमाणे लेखी तक्रार दिल्यानंतर लगेच श्री. कमलेश सोनटक्के, पोलीस निरीक्षक यांनी मी दिलेल्या तक्रारीवर कार्यवाही करणे करीता दोन शासकिय पंच लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, भंडारा येथे बोलावुन घेतले. त्या पंचांशी माझा परिचय करुन दिला व दोन्ही पंचांना मी दिलेली तक्रार समजावुन सांगुन माझी तक्रार वाचण्या करीता दिली. दोन्ही पंचांनी तक्रार अर्ज वाचुन घेवून मला सुध्दा विचारपुस केली. त्या तक्रारीवर दोन्ही पंच व श्री. सोनटक्के सर यांनी सहया केल्या. श्री. सोनटक्के सर यांनी गैरअर्जदार आज कुठे भेटतील या बाबत विचारले असता मी त्यांना गैरअर्जदार तलाठी वैभव जाधव हे सायंकाळी ०५:०० वाजताचे सुमारास तहसिल कार्यालय, मोंहाडी येथे हजर भेटतील असे सांगुन मी त्यांचेकडे गेल्यानंतर गैरअर्जदार त्याच वेळी मला २५,०००/-रुपयाची मागणी करतील असे सांगितले.

तेव्हा श्री. सोनटक्के सर यांनी मला तसेच दोन्ही पंचांना गैरअर्जदार यांचेविरुध्द करण्यात येणारे पडताळणी कार्यवाही दरम्यान गैरअर्जदार यांचे व माझ्यात होणारे संभाषण रेकॉर्ड करणे करीता वापरण्यात येणारे व्हॉईस रेकॉर्डर तसेच नवीन ३२ जी.बी चे मेमोरी कार्ड दाखवून ते कशाप्रकारे काम करते याबाबत सविस्तर माहिती देवून गैरअर्जदार यांनी मला लाच रक्कमेची मागणी केली किंवा कसें? याबाबत एन.जी.पटेल कॉलेज मोहाडी येथुन कार्यवाही करण्याचे ठरवून एन.जी.पटेल कॉलेज मोहाडी परीसरात गेलो. तिथे श्री. सोनटक्के साहेबांनी पडताळणी कार्यवाही दरम्यान करण्यात येणारे कार्यवाही संबंधाने मला तसेच पंचांना सविस्तर माहिती, सुचना दिल्यानंतर श्री. सोनटक्के सरांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये सेल टाकून सुरु केले ते आम्हास दाखवून त्यात नवीन ३२ जीबी क्षमतेची मेमरी कार्ड टाकून आम्हास दाखवून पडताळणी कारवाई करीता पंच श्री. प्रशांत भुरे यांचे आवाजात व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन व्हॉईस रेकॉर्डर माझे गळयात शर्ट चे आत घातले. मी पंच श्री. प्रशांत भूरे याचे सोबत माझे जवळील दुचाकी वाहन पल्सर मो. सा. क्रमांक **MH 40/CL 5260** ने तहसिल कार्यालय मोहाडी येथे गेलो.

गैरअर्जदार तलाठी श्री. जाधव हे तहसिल कार्यालयात आम्हाला भेटले. मी आपल्या कामासंबंधी गैरअर्जदार यांचेशी बोलणी केली व काहीतरी कमी करा असे म्हटले व त्यानंतर किती देवु साहेब असे बोलले असता गैरअर्जदार तलाठी श्री. जाधव यांनी उजव्या हाताची दोन बोटं दाखवुन ईशारा केला त्यावर मी विस म्हटले असता गैरअर्जदार यांनी मान हलवली. त्यानंतर गैरअर्जदार श्री. जाधव यांनी तुय काय म्हणनं आहे असे विचारले असता मी पंधरा देवु असे बोलला तेव्हा तू विस आणले तर मी साहेबाल म्हणु शकतो समजा साहेब पाच मी ठेवले मला काम होतं इमरजंन्सी असं असं करू शकतो तसेच राहु दयान आता मला जास्त नका बोलाय लावु आता, मला नको खराब करू माया साठी कर एवढ तुला आतापर्यंत काही त्रास दिला का असे गैरअर्जदार श्री. जाधव बोलले असुन त्यांनी स्वतःचे आर्थिक फायदयाकरीता पडताळणी दरम्यान २०,०००/-रुपयाची लाचेची मागणी केल्याने मी, पंच क्र. १ श्री. प्रशांत भूरे यांचेसह एन.जे.पटेल कॉलेज मोहाडी, येथे श्री. सोनटक्के सर थांबुन असलेल्या ठिकाणी परत गेलो. तेथे माझे गळयातील व्हॉईस रेकॉर्डर काढुन घेवुन पंच श्री. प्रशांत भूरे यांचे आवाजात बंद करण्यात आले व आम्हास श्री. सोनटक्के सर यांनी घडलेली हकिकत विचारली असता त्यांना वरील प्रमाणे हकिकत सांगितली. तसेच व्हाईस रेकॉर्डर मधील माझे आणि गैरअर्जदार मध्ये झालेल्या संभाषणाची व्हाईस रेकार्डीग ऐकुण त्यात गैरअर्जदार यांनी मी साहेबाल म्हणु शकतो समजा साहेब पाच मी ठेवले मला काम होतं इमरजंन्सी असं असे बोलले असल्याने मी सोनटक्के साहेब यांना गैरअर्जदार यांनी साहेबाचा उल्लेख केला ते साहेब म्हणजे तहसिलदार मोहाडी यांचे बाबत बोलले असल्याचे सांगीतल्याने सोनटक्के साहेब यांनी आपल्याला तहसिलदार मोहाडी यांची पडताळणी करावी लागेल असे सांगितले. मी तहसिलदार साहेबांकडे पडताळणीला उदया जावू असे सांगितल्याने पुढील कार्यवाही दिनांक १३/०३/२०२४ रोजी करण्याचे ठरविण्यात आले होते.

दिनांक १३/०३/२०२४ रोजी मला खाजगी काम असल्याने मी, सोनटक्के साहेबांना पूढील कार्यवाही दिनांक १८/३/२०२४ रोजी करण्याची विनंती केली होती. तसेच दिनांक १८/०३/२०२४ रोजी तहसिलदार मोहाडी

(signature) ८/५/२४
(कमलेश वि. सोनटक्के)
पोलीस निरीक्षक

(signature)
08/5/2024



Scanned with OKEN Scanner

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये)):

50,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

प्रकरण अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादीस आरोपी लोकसेवक श्री. वैभव जनार्धन जाधव, वय 27 वर्षे, पद- तलाठी, साझा क्रमांक 16 रोहा, रा. कान्हडगाव, पोस्ट सुलतानपुर, तालुका- खुल्ताबाद, जिल्हा- छत्रपती संभाजीनगर, ह.मु. नेहरु वार्ड मोहाडी, घनश्याम मलेवार यांचे घरी किरायाने, तालुका- मोहाडी, जिल्हा- भंडारा यांनी फिर्यादीचा रेतीचा ट्रॅक्टर दिनांक 11/03/2024 ला परमात्मा एक भवन मोहाडी जवळ पकडुन रेतीचे टॅक्टर वर कार्यवाही न करता सोडुन दिल्याचा मोबदला म्हणुन 25,000/- रुपये लाचेची मागणी करुन ती लाच रक्कम दिनांक 12/03/2024 रोजी देण्याकरीता सांगितल्याने दिनांक 12/03/2024 रोजी पडताळणी कार्यवाही दरम्यान आरोपी लोकसेवक यांनी फिर्यादी यांना तडजोडी अंती 20,000/-रुपये लाच रक्कमेची मागणी करुन ती लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविल्याने दिनांक 08/05/2024 रोजी सापळा कार्यवाही दरम्यान आरोपी लोकसेवक यास फिर्यादीवर शंका आल्याने फिर्यादी यांचे कडुन लाच रक्कम स्विकारली नाही परंतु फिर्यादी यांना आरोपी लोकसेवक लाचेची मागणी करुन लाच स्विकारण्याची संमती दर्शविल्याने तक्रारदार यांचे तक्रारीवरुन सदरचा गुन्हा नोंद.

तपासी अधिकारी:- कमलेश सोनटक्के, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, भंडारा. मो.क्र. 9422644538

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरुन अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

pradip vasant pullarwar(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with OKEN Scanner

यांचेबाबत माहीती काढली असता दिनांक १५/०३/२०२४ पासुन सुट्टीवर असल्याने पुढील कार्यवाही आठ ते दहा दिवसांनी करावी अशी विनंती केली होती. दिनांक ०८/०४/२०२४ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक, विभाग भंडारा येथे जावुन दोन्ही पंचा समक्ष गैरअर्जदार यांनी मागणी केलेली लाच रक्कम देता यांवी याकरीता माझे जवळील घरखर्चातील २०,०००/-रुपये ज्यात ५००/- रुपये दराच्या ४० चलनी नोटा सोनटक्के साहेब यांचे कडे हजर केल्या त्याचे आम्हास प्रात्यक्षिक करुन दाखवीले. त्यानंतर तहसिलदार मोहाडी यांची पडताळणी कार्यवाही करीता मोहाडी परिसरात गेलो असता तहसिलदार मोहाडी यांची निवडणुक संबंधाने तुमसर येथे डयुटी लागल्याने ते तुमसर येथे गेले असल्याचे कळाल्यावरुन तहसिलदार यांची पडताळणी कार्यवाही ही ते कार्यालयात हजर आल्यावर करण्याचे ठरविण्यात आले.

दिनांक २४/०४/२०२४ रोजी तहसिलदार मोहाडी येथे कार्यालयात हजर असल्याची माहीती मिळाल्याने मी सोनटक्के साहेब यांना माहीती दिली त्यावरुन त्यांनी दोन्ही पंचांना कार्यालयात बोलावुन घेतले. व पुढील कार्यवाही मोहाडी परिसरातुन करण्याचे ठरवून आम्ही मोहाडी परिसरात जावुन मला पंच कमांक ०१ श्री. भुरे यांचे सोबत व्हॉईस रेकार्डर रेकॉर्डींग मोडवंर सुरु करुन माझे जवळील दुचाकीने तहसिलदार मोहाडी यांचे कार्यालयात पाठविले असता तेथे तहसिलदार यांचे कक्षाचे दाराजवळ असलेल्या कर्मचारी (चपराशी) यांनी मला तहसिलदार कक्षात जावु दिले नाही. त्यामुळे मी सोनटक्के साहेब थांबुन असलेल्या ठिकाणी परत गेलो व घडलेली हकीकत सांगुन तहसिलदार मोहाडी यांची पडताळणी होणे शक्य नाही. त्यामुळे सापळा कार्यवाही ही गैरअर्जदार वैभव जाधव, तलाठी रोहा यांचेवरच करावी परंतु गैरअर्जदार वैभव जाधव हे सुट्टीवर असल्याने ते जेव्हा केव्हा सुट्टीवरुन परत येतील तेव्हा मी आपणास माहिती देईन त्यानंतरच आपण पुढिल कार्यवाही करावी अशी बिनंती केली होती.

आज दिनांक ८/०५/२०२४ ला मी लाचलुचपत प्रतीबंधक कार्यालय, भंडारा येथे जावुन सोनटक्के साहेब यांना भेटुन गैरअर्जदार वैभव जाधव तलाठी रोहा हे तहसिल कार्यालय मोहाडी येथे हजर आहेत. त्यामुळे सापळा कार्यवाही करण्याबाबत विनंती केल्याने सोनटक्के साहेब यांनी पत्र देवुन दोन पंच बोलावुन घेतले व पुढील कार्यवाही चौन्डेश्वरी मंदिर मोहाडी चे परीसरातुन करण्याचे ठरविण्यात आले. त्याप्रमाणे सोनटक्के साहेब शासकीय वाहनाने त्यांचे स्टॉफ व कार्यवाहीचे साहीत्यासह चौन्डेश्वरी मंदिर परीसरात आले. गैरअर्जदार वैभव जावध, तलाठी रोहा हे तहसिल कार्यालय मोहाडी येथे हजर असल्याने सोनटक्के साहेब यांनी सापळा कार्यवाही संबंधाने सुचना दिल्या तसेच माझी अंगझडती पंच कमांक ०२ च्या हस्ते घेवुन मी सादर केलेली लाच रक्कम लिफाप्यातुन काढुन माझे जिन्सपॅन्टचे डावे बाजुचे खिश्यात ठेवले. त्यानंतर व्हाईस रेकार्डर मध्ये नविन मेमरी कार्ड घालुन पंच कमांक ०१ यांचे आवाजात व्हाईस रेकार्डर सुरु करुन माझे गळयात लटकवले मी, माझे मोटार सायकलने पंच कमांक ०१ श्री. भुरे यांचे सोबत तहसिल कार्यालय मोहाडी येथे गेलो. गैरअर्जदार हजर असलेल्या मंडळ अधिकारी श्री. जगदिश कुंभारे यांचे कक्षात जावुन गैरअर्जदार वैभव जाथव यांचे सोबत गाडी, रेती, व यापुर्वी मागणी केलेल्या लाच रक्कमे सबंधाने बोलनी केली असता गैरअर्जदार वैभव जाथव यांना माझ्यावर शंका आल्याने गैरअर्जदार यांनी माझे सोबत का बोलतेस तहसिलदार साहेबा सोबत बोल असे बोलुन निघुन गेले.

त्यानंतर मी पंच कमांक ०१ सोबत सोनटक्के साहेब यांचे कडे परत गेलो असता पंच कमांक ०१ चे हस्ते माझे गळयातील व्हाईस रेकार्डर बंद करुन पंच कमाक ०२ यांचे हस्ते माझे जिन्सपॅन्ट चे खिश्यामधील लाच रक्कम काढुन घेवुन लिफाप्यात ठेवली व मी त्यांना सांगितले की गैरअर्जदार वैभव जाधव यांना माझेवर संशय आल्याने लाच रक्कमे बाबत बोलले नाही. तसेच त्यांनी माझे कडुन लाच रक्कम घेतली नाही. व यापुढे सुध्दा गैरअर्जदार हे माझे कडुन लाच रक्कम स्विकारणार नाही. त्यामुळे आपण गैरअर्जदार वैभव जाधव, तलाठी रोहा यांचेवर लाच मागणी संबंधाने कायदेशिर कार्यवाही करावी अशी विनंती केली. त्यानंतर सोनटक्के साहेब यांनी व्हाईस रेकार्डर मधील संभाषाण ऐकुण गैरअर्जदार वैभव जाधव, तलाठी रोहा यांना तहसिल कार्यालय मोहाडी येथील मंडळ अधिकारी श्री. जगदिश कुंभारे यांचे कक्षामधुन ताब्यात घेतले आहे. .

(signature) 8/5/24
(कमलेश कि. सोनटक्के)
पोलीस निरीक्षक
ला.प्रवि. भंडारा

(signature)
08/5/2024



Scanned with OKEN Scanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पो.हवा. अमलदार
ठाणे अमलदार
पोलीस स्टेशन मोहाडी
जि. भंडारा

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): pradip vasant pullar
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):



Scanned with OKEN Scanner

गैरअर्जदार श्री. वैभव जनार्धन जाधव, वय २७ वर्षे, पद- तलाठी, साजा क्रमांक १६ रोहा, रा. कानडगाव, सुलतानपुर, तालुका- खुल्ताबाद, जिल्हा- छत्रपती संभाजीनगर, ह.मु. नेहरु वार्ड मोहाडी, घनश्याम मलेवार यांचे घ किरायाने, तालुका- मोहाडी, जिल्हा- भंडारा यांनी माझा रेतीचा टॅक्टर दिनांक ११/०३/२०२४ ला परमात्मा एक भवन मोहाडी जवळ पकडुन रेतीचे टॅक्टर वर कार्यवाही न करता सोडुन दिल्याचा मोबदला म्हणुन २५,०००/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती २०,०००/-रुपये लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली, परंतु माझेवर गैरअर्जदार वैभव जाधव यांना शंका आल्याने सापळा कार्यवाही दरम्यान माझे कडुन लाच रक्कम स्विकारली नाही. परंतु माझा रेतीचा टॅक्टर सोडल्याचा मोबदला म्हणुन २५,०००/-रुपये लाचेची मागणी केली व तडजोडीअंती २०,०००/-रुपये लाच रक्कमेची मागणी करुन स्विकारण्याची तयारी दर्शविल्याने त्यांच्यावर कायदेशीर कारवाई होणेस फिर्याद देत आहे.

माझी फिर्याद माझे सांगितले प्रमाणे पोलीस स्टेशन मोहाडी येथे लॅपटॉपवर टाईप करण्यात आली त्याची प्रिंट काढुन मला वाचण्यास दिली मी सांगितले प्रमाणे बरोबंर टाईप केली आहे.

समक्ष

[signature]
8/5/24

(कमलेश। बि. सोनटक्के)
पोलीस निरीक्षक
ला.प्र.वि. भंडारा

[signature]
08/5/2024

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म-1)

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.** (जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)



Scanned with OKEN Scanner